**"एप्रिल २०२१" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ९ एप्रिल २०२१ च्या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय सेवा (कार्य मुल्यांकन अहवाल) नियम २००७ प्रमाणे सन २०२०-२१ मध्ये महाराष्ट्र राज्य संवर्गातील दिनांक ३१ मार्च २०२० रोजी ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी वैद्यकिय तपासणी करुन घेण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत.
- दिनांक १६ एप्रिल २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या एक सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक १९ एप्रिल २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या आठ उपमूख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी, गट-ब यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक २२ एप्रिल २०२१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र धोरण संशोधन संस्था सल्लागार समितीस दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक २२ एप्रिल २०२१ च्या शासन निर्णयान्वये भूतपूर्व दुय्यम सेवा निवडमंडळाच्या कार्यकक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) व गट-क ची पदे सरळसेवेने भरताना पॅनेलवरील कंपनीमार्फत स्पर्धा परीक्षा प्रकिया राबविण्याच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.
- दिनांक ३० एप्रिल २०२१ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेस अधिकारी व कर्मचारी यांच्या एप्रिल महिन्याच्या वेतनाकरिता सन २०२१-२२ मध्ये अनिवार्य ३६-सहायक अनुदान (वेतने) या लेखाशीर्षाखाली पहिला हप्त्यापोटी रु.१२.५० लाख इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.
- दिनांक ३० एप्रिल २०२१ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), औरंगाबाद या संस्थेस अधिकारी व कर्मचारी यांच्या एप्रिल महिन्याच्या वेतनाकरिता सन २०२१-२२ मध्ये अनिवार्य ३६-सहायक अनुदान (वेतने) या लेखाशीर्षाखाली पहिला हप्त्यापोटी रु.१०.०० लाख इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

**(ख) नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- एका निवडश्रेणी लघुलेखकास वरिष्ठ स्वीय सहायक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

**(ग) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- भारतीय प्रशासन सेवेतील ५ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- सहसचिव-१, उपसचिव-१, कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ४ अधिकारी / कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.

**(घ) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- सहसचिव-१, अवर सचिव-१ अशा २ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे.
- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१ अशा २ अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- सहसचिव-१, उपसचिव-२, अवर सचिव-८ अशा ११ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) ज्येष्ठतासूची**

- दिनांक १२ एप्रिल २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक संवर्गातील १३६१ कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २२ एप्रिल २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील ८७ कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****